अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 06 नोव्हेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 12 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीची माळ कोणाच्या गळयात!

## काँग्रेस : माजी नगरसेवक डॉ. नितीन उराडे व योगेश मिसार यांच्यात रस्सीखेच

## भाजपा : माजी नगरसेवक विलास विखार यांचेबद्दल पक्षात नाराजी

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका जाहीर केल्या. ब्रम्हपुरी नगर पालिकेसाठी ०२ डिसेंबरला मतदान होणार आहे. यासाठी दि. ०४ नोव्हेंबर मंगळवार पासून आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूकीतून नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडून द्यावयाचा आहे. ब्रम्हपुरी नगर परिषदेसाठी काँग्रेसकडून नगरध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून माजी नगरसेवक डॉ.


नितीन उराडे (काँग्रेस)


योगेश मिसार (काँग्रेस)


विलास विखार (भाजपा)


मनोज भुपाल (भाजपा)


सुयोग बाळबुध्दे (भाजपा)

नितीन उराडे, व व्यापारी संघटनेचे अध्यक्ष तथा प्रतिष्ठीत व्यापारी योगेश मिसार यांची नावे समोर येत असून, यांच्यात रस्सीखेच पहावयास मिळत आहे. तर याउलट भाजपाकडून माजी नगरसेवक विलास विखार हे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून शर्यतीत आहेत. परंतु भारतीय जनता पक्षात माजी नगरसेवक विलास विखार यांच्या विषयी नाराजीचा सूर उमटत आहे.

राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद निवडणूकीच्या तारखा जाहीर केल्या असून आचारसंहिता मंगळवारपासून लागू केली आहे. ०२ डिसेंबरला होणाऱ्या ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या निवडणूकीसाठी नगराध्यक्ष पदासाठी अधिकृत उमेदवार कोण? याविषयी राजकीय पक्षाकडून अद्यापही भूमिका स्पष्ट करण्यात आली नाही. काँग्रेस पक्षाकडून लोकचर्चेवरून माजी नगरसेवक डॉ. नितीन उराडे, व व्यापारी संघटनेचे अध्यक्ष तथा

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# २०२४ पूर्वीचे अनाधिकृत ले-आऊट नियमाकुल होणार!

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

शेतकऱ्यांच्या शेतातील पांदण रस्ते जोपर्यंत मोकळे होणार नाहीत, तोपर्यंत शेतकरी सुखी आणि समृद्ध होणार नाही. म्हणून महायुती सरकार शेतकऱ्यांसाठी बळीराजा मुख्यमंत्री पांदण रस्ते योजना लवकरच सुरू करणार आहे. तसेच सरकारी जागेवरील २०११ पूर्वीचे अतिक्रमणाचे पट्टे वाटपाचे काम सरकारने हाती घेऊन ते पूर्णत्वास नेले आहे. ब्रम्हपुरी तालुक्यात ९० टक्के लेआउट अनाधिकृत आहेत. म्हणूनच १५ ऑक्टोंबर २०२४ पूर्वीचे अनाधिकृत लेआऊट आता नियमाकुल होणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे महसूल मंत्री



चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. ते महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अंतर्गत आयोजित शासकीय पट्टे वाटप कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग ब्रम्हपुरीच्या वतीने तहसिल कार्यालय परिसरात शासकीय पट्टे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख आतिथी म्हणून चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री (म.रा), चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी भांगडीया, ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा.अतुल देशकर, नागपूर पश्चिमचे माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी आमदार नामदेवराव उसेंडी यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलतांना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, ब्रम्हपुरी तालुक्यातील २४५४ लाभार्थ्यांना विविध योजनेतंर्गत लाभ देण्यात येत आहे. महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी महसूल अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले. पट्टे वाटप करीत असतांना सरकारी अधिकाऱ्यांनी सनद चे पैसे जनतेकडून वसूल न करता, डीपीडीसी कडून वसुल करावे, तसेच ब्रम्हपुरी येथील मुख्याधिकारी आणि प्रांताधिकारी यांनी संगणमताने सरकारी जागेवर अधिवास करणाऱ्या लोकांचा प्लेन टेबल करून सर्वे करून व त्यांना पट्टे वितरीत करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी दिले. ब्रम्हपुरी तालुक्यात ९० टक्के लेआऊट अनाधिकृत आहेत, असे १५ ऑक्टोंबर २०२४ पूर्वीचे

(उर्वरित पान क्र. ६ वर)




# ब्रम्हपुरी न.प.च्या मुख्याधिकारी म्हणून डॉ. माधुरी सलामे रूजू



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या मुख्याधिकारी आर्शिया जुही यांची बदली झाल्यामुळे मुख्याधिकारी हे पद रिक्त होते. ब्रम्हपुरी नगर पालिकेचा अतिरिक्त पदभार नागभीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सोनम देशमुख ह्या सांभाळीत होत्या. प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी यांच्या बदल्यांचे आदेश शासनाने दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ ला काढले.

त्यानुसार ब्रम्हपुरी नगर पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी कार्यभार सांभाळला आहे. यापूर्वी त्या सिंधी रेल्वे जि. वर्धा येथे मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होत्या.

## संपादकीय...

# कर्जमाफीचे गाजर!

राजकारणात आश्वासन देणे सोपे, पण ते पूर्ण करणे तितकेच कठीण. शेतकरी कर्जमाफीचा विषय महाराष्ट्रात नवा नाही. गेली वीस वर्षे राज्यात सत्ताधारी कोणतेही असोत, प्रत्येकाने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे स्वप्न दाखवले. पण, आजही बळीराजा कर्जबाजारीच आहे. आता प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्या उग्र आंदोलनामुळे पुन्हा एकदा हा विषय चर्चेत आला. नागपूरमध्ये चक्काजाम करून आंदोलन पेटवलेल्या बच्चू कडू यांचा सरकारला दिलेला इशारा शेवटी फळाला आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखेर ३० जून २०२६ ही तारीख देत कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, असे सांगितले. पण हा निर्णय म्हणजे खरोखरचा दिलासा की राजकीय विलंबाचा प्रयोग, हा प्रश्न निर्माण होतो.

शेतकऱ्यांची मागणी तातडीने कर्जमाफीची होती. कारण अवकाळी पाऊस, नापिकी आणि भावघसरण यामुळे त्यांची आर्थिक कंबर मोडली आहे. मात्र, राज्य सरकारने आता 'समिती'च्या नावाखाली हा विषय आणखी सात–आठ महिने पुढे ढकलला आहे. उच्चस्तरीय समिती शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचवेल, असे सांगण्यात आले आहे. पण हे सर्व ऐकायला गोड वाटते, प्रत्यक्षात मात्र अशा समित्या अहवाल सादर करताना काळ लोटतो आणि त्या अहवालांवर धूळच बसते, हे आपण वारंवार पाहिले आहे. महायुती सरकारने निवडणुकीत कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. पण सत्तेवर आल्यानंतर या आश्वासनांचा विसरच पडला. 'लाडकी बहीण'सारख्या योजना राबवताना अब्जावधी रुपयांचा खर्च करण्यात आला, पण शेतकऱ्यांसाठी पैसा नाही, ही स्थिती दुर्दैवी आहे. पावसाने आधीच राज्याची तिजोरी रिकामी केली आहे, तरीसुद्धा बळीराजाला न्याय मिळावा, यासाठी राजकीय इच्छाशक्ती लागते आणि तीच सध्या दिसत नाही.

सरकारने ३० जून ही तारीख दिली म्हणजे 'आजचा विषय उद्यावर ढकला' हा नेहमीचा डाव. शेतकऱ्यांनी आता केवळ आश्वासनांवर विश्वास ठेवू नये, तर सरकारवर सतत दबाव ठेवायला हवा. कारण राजकीय सोय म्हणून मुदतवाढ घेणे ही सत्ता टिकविण्याची युक्ती असते. बच्चू कडू यांचे आंदोलन सरकारला जागे करण्यासाठी झाले, पण त्याचा शेवट तारीख जाहीर करण्यातच झाला, ही शोकांतिका आहे. याच निमित्ताने एक गोष्ट स्पष्ट झाली की, फक्त कर्जमाफीने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटत नाहीत. दरवर्षी पावसाचे संकट, पीकविमा योजनेतील अपयश, उत्पादन खर्च वाढ आणि बाजारातील अन्यायकारक भाव या सर्व समस्या जिवंत आहेत. जोपर्यंत शेतकऱ्याला आपल्या उत्पादनाचा योग्य मोबदला आणि स्थिर उत्पन्न मिळत नाही, तोपर्यंत तो पुन्हा पुन्हा कर्जाच्या जाळ्यात अडकणारच. २०१४ मध्ये पंतप्रधान मोदींनी 'बळीराजाचे उत्पन्न दुप्पट करू' असे सांगितले होते. पण दहा वर्षांनंतरही ती घोषणा फक्त भाषणापुरतीच राहिली. महाराष्ट्र सरकारसुद्धा आज त्याच मार्गावर चालले आहे का ? शेतकऱ्यांचे प्रश्न पुढे ढकलून केवळ तारीख जाहीर करण्याने विकास होत नाही. सरकारने खरंच शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीला न्याय देण्याचा निश्चय केला असेल, तर केवळ कर्जमाफी नव्हे तर शाश्वत उत्पन्नाची हमी देणारे निर्णय घ्यावे लागतील.

बळीराजा देशाचा अन्नदाता आहे. त्याला केवळ राजकारणाचे गाजर दाखवणे थांबवावे. '३० जून' ही तारीख खरी आशेची किरण ठरेल की फसवणुकीचा दिवस ठरेल, हे येणारा काळच सांगेल. पण एक मात्र निश्चित आहे की, जोपर्यंत शेतकऱ्याच्या हातात नांगर आहे, तोपर्यंत या राज्याचे भविष्य त्या हातांवरच अवलंबून आहे. सरकारने आता त्याचा मान राखावा, एवढीच जनता आणि शेतकरी यांची अपेक्षा आहे.

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाची राज्यस्तरीय हॅण्डबॉल स्पर्धेत उत्तुंग भरारी



ब्रम्हपुरी/का.प्र.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १९ वर्षा खालील मुलींच्या राज्यस्तरीय हॅण्डबॉल क्रीडा स्पर्धा पनवेल (मुंबई)येथे पार पडल्या. त्यात १९ वर्षा खालील मुलींच्या हॅण्डबॉल स्पर्धेमध्ये कित्येक वर्षांची परंपरा मोडीत नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरीचा हॅण्डबॉल संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

मुलींच्या संघात सानिका पारधी (कर्णधार),अक्षरा बावनकुळे, सानिया बनकर, वंशिका प्रधान, प्रियंका पारधी, प्रासिद्धी खानोरकर, माही जांभुळकर, मानसी कुणघाडकर, राणी चापले, समीक्षा राऊत, गुणगुण बेदरे, प्रांजली महाजन, अदिती राऊत, रुची चौधरी, श्रुती मेश्राम, दिशा पिलारे या सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट असे खेळाचे प्रदर्शन केले. स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील ८ विभाग सहभागी झाले होते. नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी संघ नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करत पहिला सामना अमरावती विभाग २२-०४ अश्या गोल फरकाने, दुसरा सामना नाशिक विभाग १९-०३ अश्या फरकाने जिंकत अंतिम सामना पुणे विभागासोबत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून सुद्धा ११-०९ अश्या फरकाने पराभव झाला असला तरी या स्पर्धेतील उत्कृष्ट गोलकिपरचा सन्मान कु. सानिया बनकर ह्या खेळाडूला मिळाला सोबतच संघाला पुढे नेण्याकरिता अक्षरा देवानंद बावनकुळे ह्या खेळाडूंने स्पर्धेत संघाकारिता एकूण १९ गोल केले.

महाविद्यालयात पार पाडलेल्या सत्कार समारंभात संस्थेचे सचिव मा. अशोकजी भैया यांनी सर्व खेळाडूंना भेट वस्तू व कौतुकाची थाप दिली. सोबतच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर , मेजर विनोद नरड संचालक कनिष्ठ महाविद्यालय, डॉ. के. एम. शर्मा, प्रा. आनंद भोयर पर्यवेक्षक कनिष्ठ महाविद्यालय, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, क्रीडा समिती मधील सर्व सदस्य, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी शुभेच्छा दिल्या. संघाला प्रशिक्षक म्हणून सुरज मेश्राम, शुभम जंगले, राकेश रुईकर, हतुज मेश्राम, सौरभ तलमले यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

# सायबर गुन्ह्यांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील रिलायबल अकॅडमी ऑफ कोटा शाखा ब्रम्हपुरी येथे दिनांक ३०




ऑक्टोंबर २०२५ ला सायबर क्राईम अवरनेस निमित्य पोलीस स्टेशन ब्रह्मपुरी च्या वतीने पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले, पोलीस स्टेशन ब्रह्मपुरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अरुण पिसे, पोलिस अंमलदार देवेंद्र लोणबुले बक्कल नंबर २४६ पोलीस स्टेशन ब्रह्मपुरी यांनी सायबर गुन्हे अवरनेस गुन्ह्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

प्रसंगी सायबर गुन्ह्याच्या संबंधात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पोस्को कायद्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला १०० विद्यार्थी हजर होते. यावेळी कॉलेजचे प्राचार्य रामटेके सर, व इतर शिक्षक हजर होते.

**जल है तो कल है...**

## विनोदिनी

पंधरा दिवसांपासून कामवाली बाई न आल्यामुळे हेमंतरावांची हालत बेकार झाली होती... एक दिवस दुपारची भांडी घासून झाल्यावर दरवाजावरची बेल वाजली.. बघतात तर शेजारीण एका बाई बरोबर उभी. हेमंतराव एकदम खूश. शेजारीण त्या बाईला घेऊन वहिनींबरोबर किचन रूममधे गेल्या. थोड्यावेळाने तिघी बाहेर आल्या आणि शेजारीण त्या बाईला घेऊन आपल्या घरी गेली. गडबडीत हेमंतरावांनी बायकोला विचारलं.. कधी पासून येणार?? किती पैसे मागतेय?

बायको : कोण कधीपासून येणार?

.हेमंतराव : अगं, कामवाली बाई कधी पासून येणार आणि फायनल किती पैसे मागतेय??

हेमंतरावांची बायको : ओ हॅलो..!! कोण बाई? बाई-वाई येणार नाही. ती शेजारीण, त्यांच्या कामवालीला, तुम्ही घासलेली भांडी दाखवायला घेऊन आली होती. अशी चकचकीत स्वच्छ भांडी घासायची म्हणुन..!!

# भाजपच्या वतीने आवळगांव येथे भव्य महाआरोग्य शिबीर संपन्न

## भाजपा युवा मोर्चा जिल्हा महामंत्री तनय देशकर यांच्या वाढदिवसानिमित्य उपक्रम

ब्रह्मपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने भारतीय जनता युवा मोर्चाचे चंद्रपूर जिल्हा महामंत्री तनय देशकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तालुक्यातील आवळगाव येथे भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. हृदय रोग, कॅन्सर, नेत्र तपासणी, पोटाचे आजार यासह विविध शस्त्रक्रियेसाठी निदान या ठिकाणी मोफत करण्यात आले. परिसरातील शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत भारतीय जनता पार्टी प्रति



कृतज्ञता व्यक्त केली. या शिबिरामध्ये शस्त्रक्रियेसाठी पात्र रुग्णांची शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात येणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन भाजपा नेते, ब्रह्मपुरी विधानसभेचे माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाला भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा वंदना शेंडे, जिल्हा सचिव माणिक पा. थेरकर, माजी पंचायत समिती सभापती तथा महामंत्री प्रा. रामलाल दोनाडकर, माजी अध्यक्ष प्राचार्य अरुण शेंडे, जेष्ठ नेते डॉ. गोकुल बालपांडे, जिल्हा सचिव साकेत भानारकर, बाजार समिती संचालक प्रा. यशवंत आंबोरकर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अविनाश मस्के, माजी नगरसेवक मनोज वठे, माजी अध्यक्ष इंजि. अरविंद नंदूरकर, रोशन नवघडे, आवळगाव अध्यक्ष संदीप आष्टेकर, आवळगाव सेवा सो. संचालक रामदास भोयर, पिंटू आंबोरकर, मूडझाचे माजी सरपंच घनश्याम तोमटी, डोर्लीचे उपसरपंच गिरिधर ठाकरे, केवळराम नरुले, कुमदेव लेनगुरे, राजेंद्र राऊत, पुंडलिक बुद्धे, दिलीप नरुले, कालिदास इटणकर, बंडू लोणारे, शंकर आष्टेकर यांच्या सह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या शिबिरामध्ये पेशट्टीवार मल्टिस्पेशलिटी हॉस्पिटल ब्रह्मपुरी, महात्मे नेत्र रुग्णालय नागपूर व आशा हॉस्पिटल कामठी यांच्या विशेष सहकार्याने हे शिबिर पार पडले. आवळगाव येथील भाजपाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मेहनत घेत सदर शिबिर यशस्वी केले.

---

# लो.टिळक वाचनालयात दिवाळी अंक प्रदर्शनीचे उद्घाटन

ब्रम्हपुरी/का.प्र.



ब्रम्हपुरी येथील लोकमान्य टिळक वाचनालयाच्या सभागृहात दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मान. प्रमोद बानबले यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी त्यांनी सर्व दिवाळी अंक वाचनीय असुन वाचकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे उद्घाटनप्रसंगी विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे लोकमान्य टिळक वाचनालयाचे अध्यक्ष सतिशराव शिनखेडे अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख अतिथी म्हणून दत्ताजी कात्यायन उपस्थित होते. दिवाळी अंकाचे प्रदर्शन दिनांक ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत वाचनालयाच्या सभागृहात वाचकांसाठी वाचनालयाच्या वेळेत उपलब्ध राहिल. महाराष्ट्रातील विविध प्रकाशकांनी प्रकाशित केलेले दिवाळी अंक प्रदर्शनात ठेवण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाला वाचनालयाचे कार्यकारी मंडळ व बहुसंख्य वाचकवर्ग उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वाचनालयाच्या कर्मचारी वृंदांनी अथक परिश्रम घेतले.

**वाचाल तर वाचाल**

---

# मेंडकी येथे सुसज्ज अभ्यासिका इमारत बांधकामचे भूमीपूजन




ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयभाऊ वडेट्टीवार यांचे अथक प्रयत्नाने मेंडकी येथे ४५ लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येत असलेल्या सुसज्ज अभ्यासिका इमारत बांधकामाचे भूमिपूजन विजयभाऊ वडेट्टीवार, आमदार ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघ,यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी डॉ राजेश कांबळे माजी जि.प. सदस्य, प्रमोद चिमुरकर माजी जि.प. सदस्य, मा. डॉ.थानेश्वर कायरकर सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस, खेमराज तिडके ता. काँग्रेस कमिटी अध्यक्ष, प्रभाकर सेलोकर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, मंगलाताई लोनबले, भावनाताई इरपाते, मंगलाताई इरपाते, संजनाताई घुटके, राजेन्द्र आंबोरकर, पुष्पाताई गभने, विद्याताई चौधरी, जयश्रीताई आंबोरकर, मोक्षालीताई शेंडे, अरविंद लांजेवारि, वसंता मारभते, सुरेश वाघमारे, माणिकचंद ढवळे, गुरुदेव वाघरे, सुरेश पा. ठिकरे, मधुकर करंजेकर, सुरेश वाघमारे, भुपाल खोब्रागडे, मधुकर कोरेवार, पटवारी वाटगुरे, मेंडकी येथिल समस्त नागरिक उपस्थित होते.

---

# राष्ट्रीय एकता दिनानिमित्य 'वॉक फॉर युनिटी रॅली'चे आयोजन

ब्रह्मपुरी/का.प्र.



भारत देशाचे प्रथम गृहमंत्री व उप प्रधानमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ३१/१०/२०२५ ला सकाळी ठीक ८:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे वॉक फॉर युनिटी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पोलीस विभाग ब्रह्मपुरी, गृहरक्षक दल ब्रम्हपुरी, पी.आर.डी. स्पोर्ट्स, ब्रह्मपुरी, लक्ष फिजिकल अकॅडमी , ब्रह्मपुरी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सदर रॅली ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन चे ठाणेदार प्रमोदजी बानबले, पी.आर. डी.स्पोर्ट्स, ब्रम्हपुरी चे संचालक राहुल जुआरे, लक्ष फिजिकल अकॅडमी , ब्रह्मपुरी चे संचालक प्रफुल नागपुरे, सामाजिक कार्यकर्ते सुनील साळवे यांच्या हस्ते रॅली ला हिरवी झेंडी देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक इथून रॅली सूरु करून रेल्वे फाटक आरमोरी रोड इतपर्यंत मार्गक्रमण करीत वापस छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गाने करण्यात आली. यामध्ये वॉक फॉर युनिटी, हम सब एक है, भारत माता की जय, असे जयघोष देण्यात आले.

---

# तुलान माल शाळेत राष्ट्रीय एकता दिवस

ब्रम्हपुरी/का.प्र.




ब्रम्हपुरी तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलान माल येथे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली.

दोन्ही महापुरुषाच्या फोटोंना हार अर्पण झाल्यावर,जगदीश मेहेर यांनी सरदार पटेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. तसेच इंदिरा गांधी यांच्या विषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. एकतेसाठी दौड म्हणून शालेय मुलांची दौड स्पर्धा आयोजित करण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमाला विजय कुंभारे, जगदीश मेहेर, टीकाराम बोकडे, अशोक नागोसे, चंद्रशेखर चौधरी, नीलिमा यावलकर उपस्थित होते.

**जल है तो कल है...**

# ई-लायब्ररीच्या ज्ञानार्जनातून विद्यार्थी स्पर्धा परिक्षेत इतिहास रचणार - आम. वडेट्टीवार

## ब्रम्हपुरीत अद्ययावत सुविधायुक्त ई-लायब्ररीचे थाटात लोकार्पण



ब्रम्हपुरी/का.प्र.

शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रह्मपुरी येथील अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवून प्राविण्य मिळविले. मात्र शैक्षणिक सोयींचा अभाव व महागडे शिक्षण घेणे परवडण्यासारखे नसल्यामुळे व ग्रामीण भागातील गोरगरीब होतकरू तरुण यांना उज्वल भविष्याची वाट दाखविणारे ज्ञानकेंद्र म्हणून ई-लायब्ररी उभारण्यासाठी प्रयत्न चालविले व आज त्याचे यशात रूपांतर झाले. हा ऐतिहासिक क्षण मी कदापिही विसरू शकणार नाही. याचा मला अभिमान आहे. भविष्यात स्पर्धा परीक्षांमध्ये विदर्भातील शिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा टक्का वाढावा व प्रशासकीय सेवेत उच्च स्थानी येथील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त करावे हा त्यामधील हेतू आहे, असे प्रतिपादन विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले. ब्रम्हपूरी येथील तहसील कार्यालयाच्या मागील परिसरात १० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या ई-लायब्ररीच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून पदवीधर मतदारसंघाचे आमदार अभिजीत वंजारी, ज्येष्ठ काँग्रेस नेते डॉ. देविदास जगनाडे, माजी प्राचार्य डॉ.नामदेव कोकोडे, राष्ट्रीय समन्वयक काँग्रेस ओबीसी सेल गोविंद भेंडारकर, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, कृउबा सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जि.प.सदस्य डॉ राजेश कांबळे, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, प्रदेश काँग्रेस सचिव डॉ थानेश्वर कायरकर, शहर कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, प्रा.सुभाष बजाज, माजी नगरसेवक डॉ नितीन ऊराडे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष योगेश मिसार, आर्कीटेक्चर श्रीवास्तव, कंत्राटदार राजू धोटे यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, या अभ्यासिकेमध्ये आवश्यक ती पुस्तके उपलब्ध केल्या जाईल तसेच कुठल्याही निधीची कमतरता भासली तर ती माझ्या मानधनातून त्याची पूर्तता करेन. ब्रह्मपुरी शहरात नागरिकांकरिता शुद्ध पेयजल, प्रशस्त प्रशासकीय इमारती, क्रीडा संकुलाचा विकास, भूमिगत गटार पाईपलाईन, प्रशस्त असे सांस्कृतिक सभागृह, यासह अनेक विकास कामे केली आहेत. आपली साथ नेहमी विकासासोबत राहील अशी अपेक्षा बाळगून मी सदैव आपल्या सेवेत राहुन भविष्यात या ब्रह्मपुरी शहरासह संपूर्ण विधानसभा क्षेत्राला राज्याच्या विकसनशील क्रमवारीत अग्रेसर मतदार संघ म्हणून ओळखल्या जाणार अशी ग्वाही देतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# शेतकऱ्यांनी ॲग्रोव्हिजन प्रदर्शनीचा लाभ घ्यावा - प्रा. प्रकाश बगमारे

ब्रह्मपुरी/का.प्र.

नागपूर येथे २१ ते २४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय कृषी ॲग्रोव्हिजन प्रदर्शन संपन्न होत आहे. ॲग्रोव्हिजन प्रदर्शनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनानुसार शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी, त्यांच्या समस्यांच्या मार्गदर्शनासाठी आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी दरवर्षी नागपूर येथे होत असते.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात सुरू झालेल्या ॲग्रोविजनच्या चळवळीने विदर्भाच्या कृषी विकासाला नवी दिशा दिली आहे. या महोत्सवात शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा, परिसंवाद आणि प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले असून देशभरातील प्रगत तंत्रज्ञान आणि संशोधनाचा लाभ विदर्भातील शेतकऱ्यांना मिळणार आहे .

शेती, संशोधन, संस्कृती आणि समाज याचा संगम असलेल्या या प्रदर्शनातून शेतकऱ्यांना नवे प्रयोग आणि आधुनिक शेतीच्या संकल्पना आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे. ॲग्रोव्हिजनला मागील सतरा वर्षापासून शेतकऱ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. लाखो शेतकरी, उद्योजक आणि कृषीतज्ञ या मंचावर अनुभवाची देवाणघेवाण करतात. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान आणि स्टार्ट अप्स मध्ये नवकल्पना करणाऱ्या तरुणांना प्रेरणा मिळवून देणारा हा उपक्रम आहे. २१ ते २४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या या ॲग्रोव्हिजन चा विदर्भातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, अशी विनंती प्रा प्रकाश बगमारे प्रदेश सचिव भाजपा ओबीसी मोर्चा यांनी केली आहे.

# एल.एम.बी. स्कुलच्या विद्यार्थ्यांची सुपर मार्केटला शैक्षणिक भेट



ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकतीच दि. ३१ ऑक्टोंबर २०२५ ला एल.एम.बी. पब्लिक स्कुलच्या प्रि-प्रायमरी विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांची 'कमल सुपर बाजार' मार्केटला भेट देण्याचा एक उपक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकण्यासाठी आणि स्पर्धेच्या या युगात मुलांना दैनंदिन जीवनात लागणाऱ्या प्रत्येक वस्तूचे ज्ञान व्हावे व व्यावहारिक जीवनामध्ये त्या वस्तूची देवाण-घेवाण कशी केली जाते, हे समजावे यासाठी 'कमल सुपर बाजार' ला नेण्यात आले.

सुपर बाजार मध्ये मुलांनी विविध वस्तूंची पाहणी केली. त्यामध्ये घरगूती सामान, खेळणी, अनाज, दुग्धजन्य इ. वस्तूंची माहिती देण्यात आली. त्यांची खरेदी विक्री कशी केली जाते. पैसे ऑनलॉईन पद्धतीने कसे दिले जातात. हे मुलांना समजवून सांगण्यात आले.

खरेदी व विक्री यांचे प्रात्याक्षिक अनुभव विद्यार्थ्यांना स्कूलच्या वतीने करून देण्यात आले. शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या शाळेच्या बसेस व त्यांचे ड्रायव्हर यांनी सहकार्य केले.

# ने.हि. महाविद्यालयातील डॉ. भास्कर लेनगुरे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील प्रा. डॉ. भास्कर ल. लेनगुरे यांना 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२५' ने गौरविण्यात आले. हा पुरस्कार स्वप्नपूर्ती एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात आला.



हा कार्यक्रम मल्हार नाट्यगृह, जेजुरी (पुणे) येथे दि. २६ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. विजयराव कोलते (माजी अध्यक्ष, पुणे जिल्हा परिषद) होते. शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यभरातील शिक्षकांचा या प्रसंगी गौरव करण्यात आला.

डॉ. लेनगुरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून त्यांनी शिक्षणक्षेत्रातील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव मा. अशोकजी भैया, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. एम. शेकोकर सहकारी प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

# ब्रम्हपुरीत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट, नागरिक भयग्रस्त



ब्रह्मपुरी/का.प्र.

दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सव्वासातच्या सुमारास कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात खेड रोडवर जवळपास २० ते ३० भटक्या कुत्र्यांचा मोठा समूह रस्त्याच्या मधोमध एकत्र दिसून आला. या कुत्र्यांच्या गर्दीमुळे त्या मार्गाने जाणाऱ्या वाहनचालकांमध्ये व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

रस्त्याच्या मधोमध कुत्रे बसल्याने वाहनचालकांना काही वेळ थांबून पुढे जाण्याची वेळ आली. अचानक कुत्र्यांच्या हालचालीमुळे अपघात होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली. संबंधित प्रशासनाने या भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणावे व त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी. नगरपरिषदेने याबाबत तातडीने कारवाई करून नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

******

# मंगेश जमदाडेंची 'पुस्तकाचे घर'ला भेट

## ५० संदर्भ ग्रंथ बहुपयोगी असल्याचे मत

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील कुर्झा वार्डातील कवी, लेखक, पत्रकार डॉ. धनराज खानोरकरांनी निर्मित केलेल्या 'पुस्तकाचे घर '(ग्रंथसहवास) ला चिंतामणी महाविद्यालय, घुग्घूस येथील संशोधक विद्यार्थी प्रा. मंगेश जमदाडे व मराठी विभागप्रमुख डॉ. माधव कांडणगिरे यांनी भेट देऊन ग्रंथाची पहाणी केली व संशोधनासाठी लागणाऱ्या ग्रंथाची मागणी करुन या पुस्तकाच्या घरात मला संशोधनासाठी पन्नास ग्रंथ मिळाल्याचा निर्वाळा दिला. डॉ माधव कांडणगिरेंनीही यावर भाष्य करीत बहुउपयोगी ग्रंथ संच यात असून अनेकांना याचा लाभ घेता येईल, असे भाष्य केले.




पुस्तकाच्या घराचे संचालक डॉ. खानोरकरांनी पाहुण्यांचे स्वागत करीत धन्यता मानून ग्रंथाचे आपण वाचन करावे आणि इतरांना याची माहिती देऊन वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी प्रयत्नरत रहावे, असे विचार मांडले.

# नवप्रवेशित विद्यार्थ्यांकरिता इंडक्शन प्रोग्राम कार्यक्रम

## महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेटाळा महाविद्यालयाचा उपक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेटाला ब्रम्हपुरी महाविद्यालयात दि. ३ नोव्हेंबरला




बि.फॉर्म प्रथम वर्ष तसेच डी.फॉर्म प्रथम वर्षाच्या २०२५ - २६ या सत्रासाठी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यासाठी 'इंडक्शन प्रोग्राम' चे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष देवेन्द्रजी पिसे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळेस महाविद्यालयातील प्राध्यापकांनी अभ्यासक्रम, परीक्षेचे आयोजन, परीक्षेचे द्यावयाचे गुण,एस.जी.पी.ए. तसेच सी.जी.पी.ए., प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेचे द्यावयाचे गुण, नोकरीच्या उपलब्ध विविध संधी, उद्योजकता विकास तसेच राष्ट्रीय सेवा योजना, स्नेहसंमेलन, रा.से.यो.तर्फे घेण्यात येणारे रक्त तपासणी व रक्तदान शिबिर, स्वच्छ भारत अभियान, सेमिनार, वेबिनार, पोस्टर व इ पेपर रिसर्च पेपर चे सादरीकरण, महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यशाळा, महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी पाळावयाचे नियम व शिस्त इत्यादी विषयांवर उत्कृष्ट प्रकारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष देवेंद्रजी पिसे यांनी महाविद्यालयात अनुभवी प्राध्यापक व असलेल्या विविध सुविधांचा लाभ घ्यावा व स्वत:ला समाज सेवेसाठी आणि देश सेवेसाठी घडवावे, असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन रा.से.यो.अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# पोलीस दल व होमगार्डच्या वतीने एकता दिवस

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ ला लोहपुरुष भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस म्हणून ब्रह्मपुरी शहरामध्ये पोलीस दल, होमगार्ड दल, पोलीस पाटील तसेच गावातील शाळेतील विद्यार्थी कोचिंग क्लास चे विद्यार्थी या सर्वांच्या मदतीने रन फार युनिटीचे आयोजन करण्यात आले होते.

शिवाजी चौक ते रेल्वे गेट पर्यंत रन फार युनिटी वॉकचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस वसाहत ब्रह्मपुरी येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला पोलिस व होमवर्ड तसेच पोलीस पाटील यांनी वृक्षारोपणामध्ये सहभाग घेतला. उपस्थितांचे आभार ठाणेदार प्रमोद बानबले यांनी मानले

... QUOTES ...

"Sitting alone is better than walking with the wrong people."
- Dr. APJ Abdul Kalam

चा
रो
ळी

ती आली आयुष्यात
मिळाले प्रमोशन...
ती गेली तणतणत,
मिळाले डिप्रेशन...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# उन्हाळी, हिवाळी पिकाकरीता गोसेखुर्द कालव्याचे पाणी द्या



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात अनेक गावातून गोसेखुर्द कालवा जातो. त्या संपूर्ण भागात उन्हाळी, हिवाळी पिके शेतकरी मोठ्या प्रमाणात घेत असतात. मात्र गोसेखुर्द कालव्याचे पाणी मिळत नसल्याने शेकऱ्यांचे पिकांचे फार मोठे नुकसान होत असते.

या परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी अनेकदा सबंधित अधिकाऱ्यांना पत्र व्यवहार करून शेतकऱ्यांना पाणी मिळाले नाही. सन २०२५-२६ या उन्हाळी धान पिकासाठी विभागाच्या कालव्याचे गोसेखुर्द उजवा कालवा विभागात येणाऱ्या ५६ पाणी वापर संस्थेतील संपूर्ण क्षेत्रा करिता सन २०२५ ते २०२६ या उन्हाळी हंगामाकरिता धरणाचे पाणी मिळणार की नाही असे लेखी स्वरूपात सर्व पाणी वापर संस्थेला कळवावे अशी विनंती केली होती. मात्र विभागाकडून आजतागायत कोणतेच उत्तर मिळाले नाही.

जर या वर्षी शेतकऱ्यांना उन्हाळी हिवाळी पिकांकरिता गोसेखुर्द कालव्याचे पाणी मिळाले नाही तर आम्ही कार्यालयासमोर साखळी उपोषण करू अशा आशयाचे निवेदन कॉ. विनोद झोडगे यांनी कार्यकारी अभियंता उजवा कालवा गोसेखुर्द यांना दिलेल्या निवेदनातून इशारा दिला आहे. निवेदन देतांना तुळशीराम घाटकाम, अनिल शेंडे, किशोर तुपट, दादाजी तुपट, भाऊराव ठाकरे आदी शेतकरी उपस्थित होते.

# एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड




ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कुलमधील वर्ग ८ वी च्या वृषाली योगीराज सहारे या विद्यार्थीनीने ॲथलेटिक्स स्पर्धा १०० मी. व २०० मी. धावणे या स्पर्धेमध्ये तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर आणि विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरावर झेप घेतली. १७ वर्षाखालील मुलांच्या ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये विहान विलास भोयर ने ४०० मी. हर्डल्समध्ये तालुकास्तरावर प्रथम, जिल्हास्तरावर व विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक पटकाविला. त्याची निवड राज्यस्तरावर झाली. तसेच लांब उडीमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केले. संकल्प प्रमोद जक्कनवार या विद्यार्थ्यांने ८०० मी व १५०० मी. धावण्याच्या स्पर्धेत तालुका व जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केले व विभागीय स्तरावर त्याची निवड झाली.

टयासाा बाताचा तालुकास्तरीय ॲथलेटिक्स क्रिडा स्पर्धेमध्ये १७ वर्षाखालील मुलीच्या गटात ४ ४१०० मी. रिले स्पर्धेमध्ये मुलीच्या संघाने सुद्धा प्रथम क्रमांक पटकाविला व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले. रिले संघामध्ये इ. १० वी ची खुशबु युमदेव तोरपकवार, श्रेया कैलास नाकतोडे, इ. ९ वी ची वंदीता शामराव जामकातन, प्राश्वी महेश जनबंधु ह्या विद्यार्थ्यांनी सहभागी होत्या.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया, शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका झोडे मॅडम तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे मनपुर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चीराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



## २०२४ पूर्वीचे अनाधिकृत...

(पान क्र. १ वरून)

अनाधिकृत लेआऊट आता नियमाकुल होणार आहेत, तसेच १ कोटी लोकांचे मानीव पद्धतीने रेगुलेशन करण्याचे निर्णय घेतले असल्याची तसेच औद्योगिक किंवा रहिवासी क्षेत्रातील शहरापासून १ किमी अंतरावरील एसडीओ कडून सनद संपवित असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. सध्या स्थित वन डिस्ट्रीक्ट, वन रजिस्ट्री योजना सुरू आहे, आता सेवा हमी कायदा अंतर्गत वन स्टेट, वन रजिस्ट्री योजना राबविण्यात येणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांना खरचं कर्जमाफीची गरज आहे, त्याचेच कर्जमाफी करण्यात येणार आहे. तसेच २.५ कोटी लाडक्या बहिनींना पुढील पाच वर्ष लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच पुढील पाच वर्ष शेतकऱ्यांना कृषी वीज बिल माफ करण्यात आले आहे. शासकीय कामात कामचूकारपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही. याउलट चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना यशोचित सन्मानीत करणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

प्रसंगी माजी आमदार अतुल देशकर यांनी अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान भरपाईची मा. ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था आहे. तसेच शासनाने पट्टे वितरीत करतांना २०११चे निकष वाढविणे गरजेचे असून झुडपी जंगल तसेच वनविभागाच्या जागेवरील अतिक्रमणाचे पट्टे वितरीत करण्याची मागणी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी भांगडीया यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना, २०११ पूर्वीचे अतिक्रमण धारकांना पट्टे वितरीत करण्याचा धाडसी व क्रांतिकारी निर्णय घेतल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले. आमदार विजय वडेट्टीवार यांनी संपूर्ण गावभर पट्टे मिळवून दिल्याचे होर्डिंग्ज लावले. आमदार विजय वडेट्टीवार यांचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत असतांना, तत्कालीन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात असतांना त्यांनी अतिक्रमण धारकांना पट्टे का वितरीत केले नाही? आमदार विजय वडेट्टीवार यांनी अतिक्रमणधारकांना पट्टे मिळविण्यासाठी केलेले पत्रव्यवहार दाखवावे, व पत्रव्यवहार केले असल्यास होर्डिंग्जवर लावावे? आमदार विजय वडेट्टीवार यांना गावभर होर्डिंग्ज लावले आहेत, परंतु जनतेचे अश्रू पुसण्यासाठी वेळ नाही, असा टोला प्रसंगी लगावला. महाराष्ट्र घडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे काम करीत आहेत. महाविकास आघाडीच्या सरकारने धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस दिला नाही, कृषी पंपाचे वीज कनेक्शन कापले, मात्र महायुतीच्या सरकारने शेतकऱ्यांना हेक्टरी २० हजार रूपये बोनस दिला, आणि शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीज बिल माफ केले. सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार असल्याचे भांगडीया यांनी सांगितले.

प्रसंगी अतिक्रमण धारकांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी भांगडीया, ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा.अतुल देशकर, नागपूर पश्चिमचे माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी आमदार नामदेवराव उसेंडी यांच्या हस्ते पट्टयांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन जगदिश मेहेर यांनी केले. प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी पर्वनी पाटील यांनी तर आभार मंडळ अधिकारी बोधे यांनी केले. प्रसंगी तालुक्यातील नागरीक बहुसंख्येने उपस्थित होते.

## नगराध्यक्ष पदाच्या...

(पान क्र. १ वरून)

प्रतिष्ठीत व्यापारी योगेश मिसार यांची नावे सामोर येत आहेत. कॉंग्रेस पक्षाचे विधीमंडळ पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांचे निकटवर्तीय व खंदे समर्थक म्हणून माजी नगरसेवक डॉ. नितीन उराडे यांची ओळख आहे. तर ब्रम्हपुरी तालुक्यातील प्रतिष्ठीत व्यापारी, समाजसेवक तथा सच्चा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून योगेश मिसार सर्वपरिचीत आहेत. या दोघांत रस्सीखेच असून पक्षश्रेष्ठी विधीमंडळ पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार हे या दोघांतून कोणाला अधिकृत उमेदवार म्हणून कौल देतात, या विषयी जनतेच्या मनात उत्सूकता आहे. दोन्ही तोडीचे उमेदवार असून दोघांची प्रतिमा स्वच्छ व जनतेविषयी आपूलकी निर्माण करणारी आहे.

तर माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या गोटातून माजी नगरसेवक मनोट वठे, माजी नगरसेवक मनोज भूपाल, भाजपा शहराध्यक्ष प्राचार्य सुयोग बाळबुद्धे, भाजपा माजी शहराध्यक्ष अरविंद नंदूरकर यांच्या नावाची चर्चा सुज्ञ आहे. भारतीय जनता पक्षाकडून माजी नगरसेवक विलास विखार हे नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार म्हणून प्रमुख दावेदार असले तरी त्यांचे नाव चिमूरचे विधानसभा क्षेत्राचे आमदार बंटी उर्फ कीर्तीकुमार भांगडीया यांच्याकडून समोर करण्यात आले आहे. माजी नगरसेवक विलास विखार यांनी सहा महिन्यांपूर्वीच भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. अशा नवागतांना (नव प्रवेशीत) नगराध्यक्ष पदासाठी पक्षाची उमेदवारी मिळाल्यास निष्ठावंत भाजपा कार्यकर्त्यावर अन्याय झाल्याची भावना उफळून येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे देशकर गटातून सुयोग बाळबुद्धे व मनोज भूपाल यांच्यातून एकाची उमेदवारी करीता निवड होण्याची अधिक संभावना आहे. याविषयी पक्षश्रेष्ठी कोणती भूमिका घेतात? याकडे जनतेचे लक्ष आहे.

महायुतीतील शिवसेना पक्षाने स्थानिक स्तरावर निवडणूका स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला असून शिवसेना पक्षाकडून नरू नरड हे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारी करीता अर्ज दाखल करणार असल्याचे समजते. याउलट अन्य पक्षांनी अद्यापही आपली भूमिका स्पष्ट केली नाही.

### नगर परिषद निवडणुक कार्यक्रम

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तारिख
१० ते १७ नोव्हेंबर २०२५

छाननी
१८ नोव्हेंबर २०२५

मतदान
०२ डिसेंबर २०२५

मत मोजणी
०३ डिसेंबर २०२५

बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
Lubi PUMPS-MOTORS
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404